सकाळ



कोल्हापूर : येथील श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे जिल्हा कोशागार अधिकारी अरुणा हसबे यांना प्रिंटर भेट देताना संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. शेजारी अन्य.

# कोशागार कार्यालयाला 'रवळनाथ'तर्फे प्रिंटर प्रदान

**कोल्हापूर, ता. १४ :** जिल्हा कोशागार कार्यालयातील पेन्शनर विभागाला श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे प्रिंटर कम स्कॅनर भेट देण्यात आला. त्यामुळे जिल्ह्यातील पेन्शनरांच्या सेवेला गती मिळण्यास मदत होणार असल्याचे जिल्हा कोशागार अधिकारी अरुणा हसबे यांनी सांगितले.

निवृत्तीनंतर पेन्शनरांची कामे वेळेत व्हावी, या उद्देशानेच संस्थेने प्रिंटर दिल्याचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी सांगितले.

जिल्हा कोशागार कार्यालयात निवृत्तांना दिली जाणारी वागणूक कौतुकास्पद आहे. निवृत्तांसाठी सुरू केलेल्या सुविधा कक्षामुळे निवृत्तांची कामे वेळेत होतील, असे डॉ. आर. एस. निळपणकर यांनी सांगितले. पेन्शनर विभागाचे अप्पर कोषागार अधिकारी जाधव, आमटे, 'रवळनाथ'चे कोल्हापूर शाखाधिकारी पंकज कुंभार, विशाल शिंदे उपस्थित होते.

Kolhapur, Kolhapur-Today
15/07/2022 Page No. 2